श्री राम चंद्र मिशन®

ECHOES INDIA

नोव्हेंबर २०१३ | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड ६ अंक ६

## सप्टेंबर २०१३









### बेलारूस येथील मिन्स्क आश्रमाचे उद्घाटन

नेहमीप्रमाणेच, रविवार दि. १ सप्टेंबर रोजी गुरुदेव 'गीता' अध्ययन सत्राला उपस्थित होते. त्यानंतर ते त्यांच्या कार्यालयामध्ये गेले व सर्व रशियन अभ्यासी व रशियाहून आलेले लालाजी मेमोरियल ओमेगा आंतरराष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी उपस्थित आहेत याची त्यांनी खात्री करून घेतली. गुरुदेव मिन्स्क मधील अभ्यासींशी व्हिडिओ लिंकद्वारे बोलताना म्हणाले, "हा आपला रशियन आश्रम आहे व भविष्यात आपले आणखी काही आश्रम तयार होतील." ते पुढे म्हणाले की स्लॅवोनिक लोकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते, ते कदाचित मागील जन्मांपासून असावेत. त्या सर्वांना भेटण्यासाठी पुन्हा एकदा रशियाला जाण्याची मनिषा व्यक्त करताना गुरुदेव म्हणाले, "कारण, मी परत एकदा सांगतो, की मला तुम्हा लोकांना पुन्हा भेटावेसे वाटते." गुरुदेवांच्या लक्षात आले की रशियामधील सुमारे सहा मुले सध्या ओमेगा शाळेमध्ये शिकत आहेत. ते पुढे म्हणाले, "जास्तीत जास्त मुले या शाळेत यावीत अशी माझी इच्छा आहे." भाषणाअंती त्यांनी सत्संग संचालित केला व त्यानंतर प्रसाद अर्पण करून तो रशियन भाषिक अभ्यासींमध्ये वाटला.

गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये लक्षणीय सुधारणा होत होती आणि एक दिवशी ते वॉकरच्या सहाय्याने त्यांच्या कुटीराच्या बाहेर येऊन बसले. बऱ्याच कालावधीनंतर गुरुदेवांना चालत बाहेर येता आले.

इतिहास गटाच्या कार्यकर्त्यांना गुरुदेव आपला बराच वेळ व अवधान देत आहेत. त्यांनी, "या व मला सहजमार्गाच्या इतिहासाबद्दल काहीही प्रश्न विचारा. मला शक्य होईल तशी मी त्यांची उत्तरे देईन," असे सांगितले आहे. म्हणून दररोज सकाळी हा गट गुरुदेवांच्या निवासस्थानी येतो. गुरुदेव सकाळी ९ वाजता तयार असतात. एका सत्सगानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम सुमारे एक तासाहून अधिकवेळ चालतो. गुरुदेवांना या चर्चेमध्ये अशाप्रकारे मग्न झालेले पाहणे हे दृष्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. त्यांच्या सभोवताली असणारे सर्वच जण सहजतेने त्यात ओढले जातात. चर्चेमध्ये ते ज्याप्रकारे प्रेरणा व कुतूहल निर्माण करतात ते शिकून आपल्या जीवनामध्ये अंगी बाणविण्यायोग्य आहे. गुरुदेव इतरांना प्रोत्साहित करण्यासाठी वेगळे असे काहीच करीत नाहीत तर त्यांच्या स्वयंप्रेरणेला अग्रभागी आणतात व तिचा प्रभाव सभोवतालच्या लोकांवर पडतो.







दर रविवारी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे बंधू कमलेश हे सत्संगाचे संचालन करतात तर बंधू संस्कृत कन्नन हे कुटिराच्या प्रांगणामध्ये गीतेचे सत्र आयोजित करतात. ज्ञानासंबंधीचे विवरण असणाऱ्या गीतेच्या दुसऱ्या भागावर सध्या विवेचन चालू आहे. या सत्रांसाठी उपस्थिती वाढत आहे. ज्यांस गुरुदेवांसह या सत्रांस उपस्थित रहाण्याची इच्छा आहे अशा अभ्यासींची मोठी रांग सकाळी ९ वा. आपणांस कुटिराच्या बाहेर पहावयास मिळते.

बुधवार, दि. ११ सप्टेंबर रोजी गुरुदेवांनी आश्रमाच्या मागील बाजूस असलेल्या डॉ. नटवर यांच्या सदनिकेचे उदघाटन केले व त्यानंतर तेथे जमलेल्या सुमारे ४०० अभ्यासींसाठी ४५ मिनिटांच्या सत्संगाचे संचालन केले. हा एक कृपाप्रसादाने परिपूर्ण असा प्रसंग होता. गुरुदेव दुपारनंतर आपल्या कुटिरामध्ये परत आले. संध्याकाळी त्यांनी पन्हा कुटिरामध्ये उपस्थित असणाऱ्यांसाठी सत्संगाचे संचालन केले.

गुरुवार, दि. १२ सप्टेंबर यादिवशी माधुरीचा वाढदिवस असल्याने, गुरुदेवांना तिला भेटावयास 'गायत्री' येथे जायचे होते. ती नुकतीच गुढग्यावरील शस्त्रक्रियेतून बरी होत होती. 'गायत्री' येथे त्यांनी माधुरीसमवेत तसेच परिवारासमवेत बैठकीच्या खोलीमध्ये बसून सर्वांशी बोलण्यात वेळ व्यतित केला. गुरुदेव म्हणाले, "माझ्या नातीच्या वाढदिवसाच्या दिवशी मला सर्वात जास्त आनंद वाटत आहे".

**ओणम आनंदोत्सव**

सोमवार, दि. १६ सप्टेंबर रोजी ओणमचा सण होता. सुमारे ३५० अभ्यासी केरळहून आले होते. पहाटे गुरुदेवांनी त्यांच्या कुटिराबाहेर अभ्यासी रेखाटत असलेली फुलांची रांगोळी बघण्यात काही वेळ घालवला. गुरुदेवांनी सर्वांस ओणमच्या शुभेच्छा दिल्या. निवासकक्ष 'अ' मध्ये जमलेल्या सर्व अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन करण्यासाठी सकाळी ९ वाजता गुरुदेव तेथे गेले. सत्संगाआधी त्यांनी धार्मिक रूढी व लोकांच्या समजुती यासंबंधी उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले की (एखादी व्यक्ती) हिंदू, मुस्लिम अथवा ख्रिश्चन नसते, तर आपण सर्व 'मानव' आहोत. प्रेम हे अतिशय महत्वाचे अंग आहे तसेच अशा सर्व समजुतींपासून मुक्तता मिळविण्याचे एकमेव साधन आहे. गुरुदेव म्हणाले की प्रत्येक अभ्यासी हा सहजमार्गाचा प्रतिनिधी आहे व प्रशिक्षक व अभ्यासींमध्ये काहीही फरक नसून प्रत्येकाने या मिशनच्या प्रगतीमध्ये भाग घेतलाच पाहिजे. दुपारी स्वयंपाकघरामध्ये ओणमप्रित्यर्थ विशेष पक्वान्ने बनविण्यात आली व ती गुरुदेवांसाठी कुटिरामध्ये पाठविण्यात आली.

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

दि. १८ सप्टेंबर रोजी सकाळी प्रकृती अस्वस्थ असूनदेखील व डॉक्टरांनी कुटिरामध्येच थांबण्याचा व कुटिराच्या दुरुस्तीचे काम पुढे ढकलण्याचा सल्ला दिलेला असतांना सुद्धा गुरुदेव बंधू सतबीरच्या "गार्डन ऑफ हार्टस" येथील घरी गेले. काम ठरलेल्या वेळीच सुरु झाले पाहिजे असा गुरुदेवांचा आग्रह होता. गुरुदेवांनी एकदा एखादी गोष्ट ठरविली, की त्यांना त्यापासून परावृत्त करणे खूपच अवघड आहे मग ती गोष्ट त्यांना कितीही गैरसोयीची का असेना.

सुरुवातीला एक–दोन दिवस गुरुदेवांनी सकाळी बंधू सतबीर यांच्या घरी सत्संगाचे संचालन केले पण ज्यावेळेस त्याच्या लक्षात आले की अनेक अभ्यासी ध्यानगृहामध्ये जाण्याऐवजी तेथे येत आहेत, त्यांना ते आवडले नाही. त्यांनी सर्वांना ध्यानगृहामधे जाण्यास सांगितले व म्हणाले, "तुम्ही कोठेही सत्संगास उपस्थित असलात तरी तुम्हास तीच प्राणाहुती मिळेल."

शनिवार, २१ सप्टेंबर: गुरुदेव गायत्री येथे गेले. ते स्वमग्न होते, परिवारातील सर्वांशी बोलत असतांना ते सरळ नाश्त्याच्या मेजावर गेले. नाश्त्यानंतर ते सरळ त्यांच्या कार्यालयामध्ये गेले, थोडेफार काम केले व त्यांच्या संगणकावर काही मुलाखतींचे सत्र पाहिले. गुरुदेव त्यानंतर काही अभ्यासींना भेटले व त्यांनी सर्वांना सिटींग देण्याचे ठरविले.गुरुदेवांसाठी अमेरिकेतून एक चाकांची खुर्ची आणण्यात आली आहे. ती प्रगत तंत्रज्ञान वापरुन अत्याधुनिक केलेली आहे. तिचा प्रत्येक भाग कमी जास्त करून आपल्याला हवा त्याप्रमाणे जुळवून घेता येईल अशी तिची रचना केलेली आहे. तिचा वापर करून पाहिल्यावर ते खूप आनंदित झाले.









भोजनानंतर गुरुदेव बाहेर आले व युरोपहून आलेला अभ्यासींचा समूह जिथे जमला होता त्या सभागृहात ते येऊन बसले. गुरुदेवांनी जेव्हा श्वास घेण्यासाठी त्रास होत असल्याची तक्रार केली, तेव्हा डेन्मार्कमधून आलेल्या एका भगिनीने त्यांना श्वसनाचे एक तंत्र शिकविले. त्यामुळे जणू काही चमत्कार झाला व पाचच मिनिटात गुरुदेवांचे श्वसन पूर्वीपेक्षा व्यवस्थित होऊ लागले. सायंकाळी विश्रांतीसाठी ते 'गायत्री' येथे परतल्याचे आश्रमातील सर्वांना कळविण्यास गुरुदेवांनी सांगितले.

रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी गुरुदेवांनी गायत्री येथे सत्संग संचालित केला. सभागृहात येऊन काही विवाह संपन्न केले व नवपरिणित जोडप्यांना आशीर्वाद दिले.

पुढील दोन दिवस गुरुदेव, चेन्नईच्या पश्चिमेस सुमारे ४५ कि.मी. अंतरावर असलेल्या तिरुवल्लुर येथे मिशन साठी जमीन खरेदी करण्याच्या कामात व्यस्त होते. ज्या कुटुंबाच्या मालकीची ही जमीन होती त्या कुटुंबाचे सर्व सदस्य 'गायत्री' येथे आले होते. गुरुदेव त्या प्रत्येकास व्यक्तीशः भेटले आणि त्यांना जेवण मिळाले की नाही याची त्यांनी स्वतः खात्री करून घेत–ली. खरेदीखतावर व कराराच्या इतर कागदपत्रांवर जवळ जवळ ३०० सह्या करणे हे एक प्रचंड मोठे कामच होते. सर्व कागदपत्रांची पडताळणी सुहास्य वदनाने करत दोन दिवस रात्री उशीरापर्यंत बसून त्यांनी ते काम अखेर पूर्णपणे संपविले. हे काम करत असताना ते त्या कामाचा आनंद मनापासून घेत होते. त्यावरून ते आम्हास हीच शिकवण देत होते, की कुठलेही काम करताना जर त्याचा मनापासून आनंद घेतला, तर ते कधीच त्रासदायक वाटत नाही.

शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी गुरुदेव आश्रमात परत आले. 'अज्ञानाकडून ज्ञानाकडे व ज्ञानातून अज्ञाताकडे' या विषयावर युरोपियन अभ्यासींसाठी एक चर्चासत्र नोव्हेंबर महिन्यात घेण्याचे नियोजन चालू आहे. गुरुदेव या विषयात खूपच गढून गेले होते. चर्चेच्या ओघात विषय इच्छाशक्ती व विचार यावर येऊन ठेपला. गुरुदेव म्हणाले, "इच्छाशक्ती ही 'जाणणे' व 'करणे' यातील एक दुवा आहे. 'ऑडे सपेरे' [अर्थात विचार करण्याचे धाडस करा]. पण एकदा का तुम्ही विचार करण्याचे धाडस केले, की त्यानंतर तुम्हाला ती गोष्ट करावी लागेल व तेव्हा ती गोष्ट करण्यासाठी तुम्हाला इच्छाशक्तीची गरज भासेल. जसजसा तुम्ही इच्छाशक्तीचा उपयोग कराल, तसतसे तुमच्या समोरील निवडीसाठींचे पर्याय कमी होत जातील. याची परिणिती साध्या राहणीत होईल. तर पहा, आपल्या इच्छाशक्तीचा उपयोग करून व आपले निवडीसाठींचे पर्याय कमी करून साधेपणाने व निसर्गाशी अनुरूप होऊन रहाणे, या तऱ्हेने शक्य आहे. साधी रहाणी ही सोपी गोष्ट नाही."

**तिरुवल्लुरला भेट**

गेल्या काही दिवसात चेन्नईच्या पश्चिमेस सुमारे ४५ कि.मी.अंतरावर असलेल्या तिरुवल्लुर जिल्ह्यामध्ये ११३ एकर जमीनीचे एस.एम.एस.एफ.च्या नावाने नोंदणीकरण करण्यात आले आहे. गुरुदेवांची त्या ठिकाणी भेट देण्याची इच्छा होती. बंधू विनय कृष्ण यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांच्या चमूने ध्यानासाठी शामियाना, गुरुदेवांसाठी तंबू व अभ्यासींसाठी फिरती प्रसाधनगृहे उभी करण्याची व्यवस्था एका रात्रीत केली. चेन्नई आणि तिरुवल्लुर तसेच आसपासच्या परिसरातून जवळ जवळ ३०० अभ्यासी तेथे जमले होते.

गुरुदेवांसाठी खास प्रकारच्या आसनाची रचना केलेल्या आपल्या मर्सिडीज गाडीतून गुरुदेवांचे २८ सप्टेंबर रोजी सकाळी ८वा.३० मिनि–टांनी समारंभ स्थळी आगमन झाले. त्यांनी प्रसाद अर्पण केला व ते ध्यानगृहात आले. त्यांनी सुमारे ४५ मिनिटांचा सत्संग संचालित केला व जमलेल्या समुदायास उद्देशून भाषणही केले. या जमिनीचा वापर कसा करावा या विषयी त्यांनी आपले विचार सर्वांसमोर मांडले. त्यामध्ये एक आरोग्य केंद्र, ध्यानगृह, शेती, दुग्धशाला (डेअरी) व जनावरांच्या चाऱ्यासाठी शेती, इ. गोष्टींचा समावेश होता. तथापि ध्यान हाच प्रमुख उपक्रम असेल असेही त्यांनी स्पष्ट केले. नवीनच अभ्यासी झालेले तिरुवल्लुर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी बंधू वीरराघव राव हेही सत्संगास उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाकडून सर्व प्रकारचे सहाय्य देण्याचे अभिवचन त्यांनी दिले. ज्या कुटुंबाने ही जमीन विकली, त्या कुटुंबातील सुमारे तीस सदस्य कार्यक्रमास आले होते व त्यांनी गुरुदेवांना नम्रपणे वाकून नमस्कार करत अभिवादन केले. गुरुदेवांनी त्यांना प्रसाद दिला व त्यांच्या सोबत छायाचित्र काढण्यासाठी पोज दिली. अभ्यासींनी एक भलामोठा चॉकलेट केक आणला होता. तो गुरुदेवांनी कापला व सर्वांना वाटला. गुरुदेवांच्या विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली होती तरीही गुरुदेवांनी विश्रांती घेतली नाही व चाकांच्या खुर्चीत बसूनच त्यांनी न्याहारी केली. संपादित केलेल्या पूर्ण क्षेत्रात केळी, भात, नारळ इ.ची मशागत केली जात आहे व त्यामुळे ते संपूर्णतः हिरवेगार दिसत आहे. तिथे बऱ्याच खुल्या विहीरी तसेच विंधण विहीरी (बोअर वेल) आहेत. त्या नंतर गुरुदेव आपल्या गाडीत आरूढ झाले व उपलब्ध असलेल्या काही रस्त्यांवरून जमिनीची जमेल तेवढी पाहणी करून त्यांनी चेन्नईस प्रयाण केले.

२९ सप्टेंबर रोजी गीतेवरील सत्र संपल्यावर गुरुदेवांनी थोडा वेळ भाषण केले. ते म्हणाले, "आपण सर्वजण या सत्रांपैकी अनेक सत्रांना उपस्थित होतो आणि बंधू संस्कृत कन्नन यांनी हे गीतेतील श्लोक इतक्या

विस्ताराने समजावून सांगितले आहेत की आता आपण त्याचा अर्थ आत्मसात करून तो आपल्या हृदयात खोलवर रुजविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तेव्हा पुढील दोन रविवारी फक्त प्रश्नोत्तरांचे सत्र घेण्यात य-`ईल.”

## ऑक्टोबर २०१३

दि. ४ ऑक्टोबर रोजी बंधू पी. आर. कृष्णा अन्य काही अभ्यासींसह तिरुवल्लुर येथील जमिनीची पाहणी करून नियोजनाचा एक प्राथमिक आराखडा तयार करण्यासाठी तेथे रवाना झाले. गुरुदेवांनी सांगितले की, बंधू पी. आर. कृष्णा हे ह्या जमिनीच्या संदर्भातील सर्व कामकाज हाताळतील. सध्या तरी या जमिनीत प्रामुख्याने शेती करण्यावर भर दिला जावा, असे गुरुदेवांना वाटते.







### चीन येथून आलेल्या अभ्यासींसाठी चर्चासत्र

मंगळवार, दि. १ ऑक्टोबर : मुख्यत: चीनमधून तसेच अन्य देशांतूनही सुमारे ११० चीनी अभ्यासी मणपाक्कम येथे एका चर्चासत्रात भाग घेण्यासाठी आले होते. गुरुदेव या चर्चासत्राची आतूरतेने वाट पाहात होते. सकाळी साडेआठ वाजता गुरुदेवांच्या कुटीरापाशी जमलेल्या चीनी अभ्यासींचे स्वागत करण्याच्या हेतूने गुरुदेवांनी आपल्या कक्षातून बाहेर येण्यापूर्वी पटकन काही चीनी भाषेतील शब्द शिकून घेतले. चालत बाहेर येत असताना गुरुदेव चीनी भाषेत बोलले. ते ऐकून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ते स्वत: चीनी भाषा शिकू शकले नाहीत या विषयी गुरुदेवांनी खंत व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की चीनी भाषा शिकण्याच्या व चीनला भेट देण्याच्या दृष्टीने ते आता खूप वृद्ध झाले आहेत. गुरुदेवांनी सांगितले की अधिकाधिक चीनी अभ्यासींनी दर वर्षी चेन्नईस येण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी गंगटोक (सिक्किम, भारत) येथील आश्रमाचाही उल्लेख केला. रिट्रीटसाठी (एकांतात काही काळ व्यतीत करण्यासाठी) ते एक उत्तम ठिकाण आहे व अभ्यासींनी या सुविधेचा लाभ घेतला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. नंतर गुरुदेवांनी एक सिटींग दिली. चर्चासत्रामधील पुढील कार्यक्रमासाठी अभ्यासींना वसतिगृह ‘अ’ येथे जाण्यास सांगितले गेले.

दुसऱ्या दिवशी गुरुदेव स्वयंचलित चाकांच्या खुर्चीतून भगिनी गीतूच्या सदनिकेचे उद्घाटन करण्यासाठी गेले. चर्चासत्रात सहभागी झालेल्या अभ्यासींनासुद्धा या कार्यक्रमाचे आमंत्रण होते. संध्याकाळच्या सुमारास ते कुटीरामध्ये परतले. गुरुदेवांनी चाकांच्या खुर्चीचा बराच वापर केल्याने त्यांच्या पायास फोड आले व ते फोड फुटले. त्यामुळे त्यांना तीव्र वेदना होऊ लागल्या. डॉक्टरांना त्यांच्या त्वचेचा काही भाग काढून टाकावा लागला. त्या जखमा भरून येईपर्यंत गुरुदेवांना आपले पाय वर उचलून ठेवावे लागले. आधीच गुरुदेवांना ज्या शारीरिक अवस्थेतून जावे लागत आहे, ते लक्षात घेता या नव्या समस्येचा सामना करताना त्यांना पहावे लागणे, हे खूपच दुखःदायक होते.

शनिवारी सकाळी चर्चासत्रात सहभागी झालेल्या अभ्यासींना भेटावे असे गुरुदेवांचे नियोजन होते. पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते बाहेर येऊ शकले नाहीत. तरीही त्या दिवशी जे अभ्यासी परत जाणार होते अशा वीस अभ्यासींना गुरुदेव शांतपणे भेटले. बंधू कमलेश यांनी वसतिगृह ‘अ’ मध्ये राहणाऱ्या अभ्यासींसाठी सत्संग संचालित केला व त्यांच्यासमोर एक भाषणही केले.

रविवारी गुरुदेवांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांनी बंधू कमलेश यांना ध्यानगृहातील सत्संग संचालित करण्यास सांगितले तर चर्चासत्रातील सहभागींसाठी कुटीरामध्येच सत्संग घेण्यास बंधू पी. आर. कृष्णा यांना सांगितले. आलेल्या गटासमवेत थोडा वेळ घालवावा म्हणून गुरुदेव सत्संगानंतर बाहेर येऊन बसले. संपूर्ण वातावरण त्यांच्या प्रेमाने भारावले होते व अनेक अभ्यासींच्या डोळ्यात त्यामुळे अश्रू तरळले. गुरुदेवांचे सखोल प्रेम अभ्यासींच्या काळजाला भिडणारे होते.



स्वयंपाकगृहातील स्वयंसेवकांच्या चमूला मिठाई व एक प्रकारचे मोदक (डंपलिंग) बनविण्यासाठी व तेथे जमलेल्या प्रत्येक अभ्यासीपर्यंत ते पोहोचविण्यासाठी गुरुदेवांनी सूचना दिल्या होत्या. चीनी व व्हिएटनामी अभ्यासींनी एक छोटासा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या सत्रामध्ये गुरुदेवांनी त्यांच्यापाशी जे काही आहे त्या सर्वाचा वर्षाव केला आहे, असे प्रत्येकालाच जाणवत होते. जे अभ्यासी त्याच दिवशी परत जाणार होते अशा अभ्यासींसाठी प्रकृती बरी नसतानाही गुरुदेवांनी वेळ दिला.


चीनी भाषेविषयी बोलताना गुरुदेव म्हणाले, "जर तुम्ही योग्य अशा मन–:स्थितीत असाल तर तुम्ही कोणतीही गोष्ट शिकू शकता. मी चीनी भाषा शिकत आहे. इंग्लीशमध्ये बावन्न ध्वनी आहेत तर चीनी भाषेत फक्त चार. चीनी भाषा ही सुंदर व अर्थपूर्ण आहे. उदा. चीनी भाषेत 'हॅपी' (आनंदी) हा शब्द लिहावयास फक्त दोन अक्षरे लागतात व त्याचा प्रत्यक्षात अर्थ होतो, 'हृदय खुले करा'."

सोमवार दि.७ ऑक्टोबर हा चीनी अभ्यासींच्या चर्चासत्राचा शेवटचा दिवस होता. गुरुदेवांनी सहभागी अभ्यासींना पंचेचाळीस मिनिटांचे सिटींग दिले. सत्संगानंतर गुरुदेव खूपच दमले होते. तरीही त्यांनी काही अभ्यासींना भेटून त्यांचे अभीष्टचिंतन केले व मगच ते विश्रांतीसाठी गेले. संध्याकाळी 'कान्हा' प्रकल्पावर काम करणारे अभ्यासी आले होते. गुरुदेवांची त्यांच्याबरोबर एक बैठक झाली व त्यानंतर त्यांनी त्या सर्व अभ्यासींना एक सिटींगही दिले.

"प्रत्येकालाच जीवन मिळालेले आहे पण आपण जीवनातील अशा अस्तित्वाचा शोध घेतला पाहिजे की जे अंतिमतः स्वतःच्याच मूलतत्वात लय पावते."

*कंप्लीट वर्क्स ऑफ रामचंद्र*

***खण्ड ३, पृष्ठ १४७***



## बंधू कमलेश पटेल यांचा गुजरात दौरा

दि. ११ सप्टेंबर रोजी बंधू कमलेश यांचे अहमदाबाद येथे आगमन झाले. हा त्यांचा खाजगी दौरा आहे असे जरी सांगण्यात आले होते, तरी त्यांनी गुजरातमधील प्रमुख केंद्रांना भेटी दिल्या.

दि. १५ रोजी, अहमदाबाद येथील अडालज आश्रमामध्ये सुमारे ९०० अभ्यासी जमले होते. बंधू कमलेश यांनी सत्संगाचे संचालन केले आणि नियमित साधना करण्याचे महत्व अधोरेखित करणारे भाषण केले. आपली चेतना अधिक शुध्द व संवेदनशील बनविण्यासाठी आपण ध्यान करतो हे त्यांनी स्पष्ट केले. अहमदाबाद मध्ये त्यांनी 'गूढ चिन्ह पदक' सादर केले. याची मर्यादित आवृत्ती उपलब्ध आहे. विविध केंद्रातील अभ्यासींच्या गटांनाही ते भेटले.

दि.१६ रोजी त्यांनी कमलपूरला भेट दिली व मंगळवारी भावनगरला प्रयाण केले. प्रश्नोत्तराच्या सत्रात बंधू कमलेश यांना 'तुमचा गुरुदेवांसमवेतचा सर्वात महत्वाचा क्षण कोणता?' असे विचारल्यावर त्यांना उत्तराधिकारी म्हणून घोषित करण्यात आले त्या प्रसंगाबद्दल सांगितले. नंतर त्यांनी वडोदरा व सुरतसाठी प्रस्थान केले.



सुरतमधील प्रश्नोत्तराच्या सत्रात त्यांनी साधनेच्या विविध पैलूंविषयी स्पष्टीकरण दिले. ध्यानकक्ष बांधण्याचा व तो सुरत केंद्राला भेट देण्याचा एका अभ्यासीचा प्रस्ताव त्यांनी मान्य केला. नंतर त्यांनी नवसारी आश्रमाकडे प्रयाण केले. तेथून ते बलसाड येथे रवाना झाले. तेथील अभ्यासींना भेटून, सत्संगाचे संचालन करून त्या रात्री ते वडोदरा येथे परतले.

दि. २१ सप्टेंबर रोजी संपूर्ण गुजरात मधून सुमारे १००० अभ्यासी वडोदरा येथे जमले होते. रविवारी सत्संगानंतर त्यांनी आपल्या साधनेशी सांधलेल्या सूक्ष्म शास्त्रावर भाषण केले. दुसऱ्या दिवशी त्यांनी आणंदला भेट दिली आणि दि. २५ रोजी ते अहमदाबादला परतले. दि. २७ रोजी जीआयटीपी कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यासाठी त्यांनी अडालज आश्रमाला भेट दिली. त्यासाठी गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश येथील पंचाहत्तर अभ्यासी उपस्थित होते. दि. ३० रोजी त्यांनी कडी येथे सत्संगाचे संचालन केले, त्यासाठी कडी, पालनपूर, मेहसाणा, कलोल व उंझा येथील सुमारे १२५ अभ्यासी उपस्थित होते. त्यातील बरेचसे नवीन अभ्यासी होते. बंधू कमलेश यांनी त्यांना जीवनात सहजमार्गासारखी सूक्ष्म प्रणाली स्वीकारण्याचे महत्व समजावले. नंतर अहमदाबादला जाण्यापूर्वी त्यांनी कलोल येथील अभ्यासींसोबत काही काळ व्यतीत केला. दि. २ ऑक्टोबर रोजी त्यांचा गुजरात दौरा आटोपून ते चेन्नईला रवाना झाले.





### आश्रम व्यवस्थापन कार्यक्रम

दि. २० ते २४ ऑगस्ट रोजी मणपाक्कम येथे आयोजित करण्यात आलेल्या एका पाच दिवसीय कार्यक्रमामध्ये संपूर्ण देशभरातील आश्रम व्यवस्थापक, इच्छुक स्वंयसेवक आणि केंद्रप्रमुख अशा सुमारे पंचेचाळीस सहभागींचा समावेश होता. आश्रमांचे व्यवस्थापन व्यावसायिक दृष्टीकोनातून व्हावे या गुरुदेवांच्या इच्छेपासून प्रेरणा घेऊन ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक दिवसासाठी एक संकल्पना ठेवण्यात आली होती– उदा. आपल्या आश्रमासाठी एक स्वप्न/दृष्टी निर्माण करणे, आश्रमाचा उपयोग योग्यरीतीने करण्यासाठीच्या कल्पना, आध्यात्मिक मुमुक्षुच्यां सेवेसाठी आश्रमांचे संयोजन करणे, आश्रमांची देखभाल आणि आश्रमांचे कामकाज करताना परस्पर विश्वास व आदर यांची जोपासना. या कार्यक्रमात सत्संग, भाषणे, सादरीकरणे, गुरुदेवांच्या चित्रफिती, गटचर्चा होत्या आणि महत्वाचे म्हणजे मणपाक्कम आश्रमातील बत्तीस विभागांना भेट देण्यात आली.

दुसऱ्या दिवशी बंधू कमलेश यांनी आश्रमात करता येण्यासारखे संभाव्य कार्यक्रम आणि आश्रमाचे वातावरण स्वागतार्ह व उत्साहपूर्ण बनवण्यासाठी करायचे प्रयत्न यावर त्यांचे विचार मांडले. गुरुदेवांची प्रकृती ठीक नव्हती तरीही त्यांनी शेवटचे दोन दिवस सहभागींना संबोधित केले. शेवटच्या दिवशी, सत्संगाचे संचालन केल्यानंतर त्यांनी भाषण केले. आश्रमाच्या देखभालीची सुरवात खरेतर प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक आंतरिक देखभालीपासून होते, म्हणून आपण प्रत्येकाने आपल्या हृदयामध्ये आश्रम निर्माण केला पाहिजे यावर गुरुदेवांनी भर दिला. ते म्हणाले की आश्रमाची देखभाल ही सहजमार्ग या जगण्याच्या पद्धतीचे पूर्णत्व दर्शवते.



### नवीन केंद्र– पाचोर, मध्यप्रदेश

दि. २ ऑक्टोबर रोजी मध्यप्रदेश मधील राजगड जिल्ह्यातील पाचोर येथे एका खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्यासाठी पाचोर व जवळपासच्या गावांमधून सुमारे १५० इच्छुक आले होते. भगिनी रूची श्रीवास्तव यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर, बंधू प्रभाकर दास आध्यात्मिकतेची गरज, सहजमार्गातील गुरुदेव आणि मिशन देत असलेल्या सेवा यांविषयी बोलले. भगिनी संगीता दास यांनी साधनेचे विविध पैलू व त्यांच्या दैनंदिन जीवनावर होणाऱ्या परिणामांची माहिती दिली. यानंतर झालेल्या अनौपचारिक संवादी सत्रानंतर पंचवीस इच्छुकांनी साधना सुरू करण्याची तयारी दर्शवली. त्यांना साधनेसंबंधी असलेली त्यांची भूमिका व अपेक्षित जबाबदारीची माहिती सविस्तरपणे सांगण्यात आली. यापैकी दहा जणांनी त्वरित आणि बाकी जणांनी पुढील आठवड्यात सिटींग घेतल्या. अशाप्रकारे मध्य प्रदेशच्या या भागात एक नवीन केंद्र अतिशय सहजपणे निर्माण झाले.

### कोलाकालुरू, आंध्र प्रदेश मधील विभागीय आश्रम

विजयवाडा, गुंटुर, तेनाली आणि मंगलागिरी येथील अभ्यासींची आध्यात्मिक गरज पूर्ण करण्यासाठी खाजीपेटा, गुंटुर येथे सुमारे पन्नास एकर जमीन एम जी. बंधू रियल इस्टेट यांनी संपादित केली. सुमारे १८.७५ एकर जमीन आश्रमासाठी व उर्वरित जमीन अभ्यासींच्या श्री. पार्थसारथी नगर या निवासी वसाहतीसाठी राखून ठेवण्यात आली.

गुरुदेवांच्या आशीर्वादाने दि. २ फेब्रुवारी २०१२ रोजी विभाग प्रमुख बंधू मधु कोथापल्ली यांच्या हस्ते कोनशिला बसविण्यात आली. दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गुरुदेवांनी थेट प्रक्षेपणाद्वारे आश्रमाचे उद्घाटन केले व तो पूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केला. गुरुदेव या प्रसंगी म्हणाले “आश्रमांचा वापर केला गेला पाहिजे आणि ते विद्यार्थी नसलेल्या शाळेसारखे बनायला नकोत.” कोलाकालुरू मधील अभ्यासींनी हा प्रसंग हर्षोत्फुल्ल हृदयाने साजरा केला. आता येथे नियमित सत्संग व पूर्ण दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## युवा कार्यक्रम

**अहमदनगर, महाराष्ट्र**



दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी भगिनींनी बनविलेल्या स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेऊन बावीस जणांच्या युवा गटाने एफर्ट्स तारामंडळाला भेट दिली. तारामंडळामध्ये नोंदणीनंतर आणि परिचय फेरीनंतर, मिशनच्या साहित्यातील संकेत शब्दांचा उपयोग करुन मूक अभिनयाचा खेळ खेळण्यात आला. शब्दांशिवाय केवळ हृदयातुन कल्पना व्यक्त करता येतात याचा हा खेळ म्हणजे उत्तम उदाहरण होते. तारामंडळामधील आकाशगंगा, ग्रह आणि तारे यांची सखोल माहिती देणारा नियोजित कार्यक्रम शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त होता. या सहलीमुळे अभ्यासींमध्ये बंधुभाव आणि एकी वाढण्यासाठी मदत झाली.

**भिलवारा, राजस्थान**

दि.२५ ऑगस्ट रोजी मासिक युवक कार्यक्रमाचा भाग म्हणून हरणी महादेव येथील सहलीमध्ये बारा युवक आणि दोन मुले सहभागी झाली होती. सहभागींनी त्यांची सहजमार्ग साधनेची सुरुवात कशी झाली आणि त्यांचे ध्येय काय आहे याविषयावर आपले अनुभव सांगितले. यामधून असे स्पष्ट झाले की बरेच अभ्यासी वास्तविक ध्येयाबद्दल अनभिज्ञ होते. मिशनच्या साहित्यामधून या विषयावरील काही उतारे वाचून दाखविण्यात आले. या विषयावर अधिक भर दिला जावा असे सर्वांना जाणवले. त्यासाठी प्रत्येक रविवारी सत्संगानंतर ध्यानकक्षामध्ये १५ ते २० मिनिटे थांबून आपले अनुभव कथन करावेत असे ठरले.



**यु.एन. आंतरराष्ट्रीय युवा दिवस– वेबिनार (इंटरनेट परिसंवाद)**



दि. १२ डिसेंबर २००५ रोजी एस.आर.सी.एम. एक अशासकीय संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या सार्वजनिक माहिती विभागाशी (यु.एन.डी.पी.आय.) संलग्न झाले. याचे मुख्य ध्येय 'जात, वर्ण, पंथ, धर्म, राष्ट्रीयत्व आणि लिंग असे भेद विचारात न घेता परस्पर प्रेम आणि वैश्विक बंधुभाव या भावनांची वृद्धी करणे' हे होते.

संयुक्त राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय युवा दिवस साजरा करण्यासाठी दि. १७ ऑगस्ट २०१३ रोजी 'वैश्विक प्रार्थना– प्रेम हे परिवर्तनासाठी आवश्यक असे इंधन आहे' या विषयावर आधारित इंटरनेटवरील परिसंवाद सर्व आंतरराष्ट्रीय कालविभागांमधुन सुमारे ४६४९ सहभागींसह पार पडला. ब्राझील येथील साओ पौलोच्या बंधू आंद्रे बरेटो यांच्या प्रस्तावनेने परिसंवादाला सुरुवात झाली. यानंतर युवकांना संबोधित करणारे गुरुदेवांचे छोटे भाषण प्रसारित करण्यात आले. एस.आर.सी.एम चे यु.एन.डी.पी.आय. बरोबर अनुबंध यावर पॅरिस येथील भगिनी एकता बाउडलार्क यांचे सादरीकरण झाले. बंधु रिशभ कोठारी यांनी बाबूजी महाराजांच्या दि.१७ नोव्हेंबर १९९९ च्या व्हिस्पर्सच्या संदेशाचे वाचन केले आणि परिसंवादाच्या मूळ विषयावर त्यांनी भाषण केले.

मुख्य भाषणानंतर प्रश्नोत्तरांच्या सत्रात बंधू रिशभ कोठारी आणि भगिनी एकता बाउडलार्क यांनी सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे दिली. युवकांना आपले अनुभव आणि आव्हाने कथन करण्यासाठी हा एक उत्तम मंच मिळाला. यावेळी लालाजी मेमोरियल शाळेतील सुमारे १५० विद्यार्थ्यांसह एकूण २०० सहभागी मणपाक्कम येथे जमले होते.

परिसंवादाशेवटी झालेली 'वैश्विक प्रार्थना' हा या बैठकीचा प्रत्यक्ष कृतीशी निगडीत असलेला हृदयस्पर्शी पैलु होता. जगातील सर्व संस्कृतींना प्रार्थनेचे महत्त्व 'प्रेमातुन परिवर्तन घडवून आणणारे साधन' म्हणून पटले आहे. परिसंवादाशेवटी जगभरातील विविध केंद्रांमधुन आणि आश्रमांमधुन 'वैश्विक प्रार्थना' केलेल्या अनेकांना, एकमेकांशी जोडले गेल्याचे आणि अधिक चांगल्या जगाची निर्मिती करण्याच्या त्यांच्या भावनेला पाठींबा मिळाल्याचे जाणवले.

## प्रशिक्षक बैठका






### त्रिची, तामिळनाडू

दि.२१ सप्टेंबर रोजी त्रिची येथे आयोजित करण्यात आलेल्या तामिळनाडू (विभाग २अ) मधील प्रशिक्षकांच्या बैठकीस विभाग प्रमुख बंधू मुरुगन आणि तामिळनाडूतील अनेक प्रशिक्षक उपस्थित होते. अखिल भारत प्रमुख बंधू राजेश राठोड हेही या कार्यक्रमास उपस्थित होते. दिवसाची सुरुवात ७:३० वाजता सकाळच्या सत्संगाने झाली. यानंतर 'प्रशिक्षकांच्या अनुभवांची व्याप्ती कशी वाढवावी' या कार्यक्रमाअंतर्गत 'सिटींग्स कशी द्यावी?' या विषयावर दि.२३ जानेवारी २०१३ रोजी त्रिची येथे पू. गुरुदेवांनी दिलेल्या भाषणाचा व्हिडीयो दाखविण्यात आला. यानंतर 'तुमच्या केंद्रातील सर्वोत्तम गोष्ट कोणती?' व 'गेल्या एका वर्षात तुमच्या केंद्रातील कोणत्या नव्या गोष्टींमुळे तुमच्या केंद्रात बदल घडून आला?' अशा दोन विषयांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येकाने यावेळी आपापल्या अनुभवांची देवाण–घेवाण केली. या फलदायी चर्चेमुळे सर्वांनाच इतर केंद्रांमधील उपक्रमांची माहिती व शिकण्याची संधी मिळाली. यानंतर बंधू मुरुगन यांनी केलेल्या एका सादरीकरणात विभाग २अ विषयी माहिती व या विभागात राबवले जाणारे उपक्रम प्रस्तुत केले. तेथे उपस्थित असणाऱ्या सर्वांकडून काय अपेक्षा आहेत हेही त्यांनी सांगितले. दुपारच्या वेळी संधी आणि सुधारणेला वाव असणाऱ्या कामांविषयी चर्चा झाली. यावेळी बंधू राजेश यांनी अनेक गोष्टी सविस्तरपणे स्पष्ट करून सांगितल्या. 'उत्तम प्रशिक्षक कसे बनावे?' हा गुरुदेवांचा व्हिडिओ यावेळी दाख्रविण्यात आला. सायंकाळच्या ६ वाजताच्या सत्संगाने या सत्राची सांगता झाली.

### लखनौ, उत्तर प्रदेश

दि.२८–२९ सप्टेंबर रोजी बंधू उमाशंकर वाजपेयी (सचिव) यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर प्रदेश (मध्य) या विभागातील सुमारे १०० प्रशिक्षकांकरिता दोन दिवसांची एक बैठक बाबूजी मेमोरियल आश्रम, लखनौ येथे आयोजित करण्यात आली होती. विभागप्रमुख बंधू अशोक गर्ग यांनी उपस्थित प्रशिक्षकांचे स्वागत करून या चर्चासत्राचा फायदा व्हावा याकरिता मन आणि हृदय खुले ठेवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. 'आदर्श प्रशिक्षक बना', 'सिटींग कसे द्यावे?' आणि 'शिस्तीची गरज' या विषयांवर गुरुदेवांनी दिलेल्या भाषणांच्या तीन डिव्हिडी दाखविण्यात आल्या. 'प्रशिक्षकाची भूमिका' या विषयावर बंधू न्यायमूर्ती आर.आर. के. त्रिवेदी यांनी भाषण दिले. बंधू के.के. सक्सेना यांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शिकेमधील मुद्द्यांवर आधारित सादरीकरण केले. बंधू आशिष सिंग यांनी प्रशिक्षकांना प्रेमपूर्वक, बंधुभावाने आणि सामंजस्याने काम करणारे, समर्पित व प्रामाणिक असे अभ्यासी बनण्यास प्रोत्साहित केले. त्रिची येथे झालेल्या 'प्रशिक्षकांच्या अनुभवांची व्याप्ती वाढविणे' या कार्यक्रमावर आधारित भाषण भगिनी प्रियदर्शिनी यांनी यावेळी केले. बंधू ओ.एल. गुलिया आणि बंधू आर.एस.एल. श्रीवास्तव यांनी केंद्रांच्या इतिहासावर कसे काम करायचे ते सांगितले. विभाग प्रमुख बंधू अशोक गर्ग यांनी त्यांच्या विविध केंद्रांच्या भेटींवर आधारित वृत्तांत सादर केला. समारोपाच्या वेळी बंधू वाजपेयी यांनी बंधू अशोक गर्ग यांचे हे चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल आभार मानले. सर्व प्रशिक्षक अधिक उत्तम प्रशिक्षक बनण्याच्या उत्साहात आपापल्या केंद्रांकडे परतले.

### मेंगलोर, कर्नाटक

बंधू मोहनदास यांनी 'आपल्या आध्यात्मिक स्थितीचे वाचन कसे करावे?' यावर दि. १ सप्टेंबर रोजी एक सत्र संचालित केले. त्यांनी दैनंदिनी लिखाणातून आपली संवेदनशीलता आणि सतर्कता वाढविण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. सत्संगादरम्यान व नंतर जाणवलेली शांतता, खोली, तल्लीनता व निस्तब्धता तसेच काळ व वेळाची जाणीव या गोष्टींची दैनंदिनीमध्ये नोंद करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की दैनंदिनी लिखाण हे शुध्दीकरण करण्याचे आणि अंत:प्रेरणा वाढविण्याचे एक साधन आहे. त्यांनी सांगितले की अवस्था आणि अनुभव या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. अवस्था ही स्वत:च्या अस्तित्वाची बाब आहे. 'तळमळ उत्पन्न करण्याची साधने आणि मार्ग' यावर देखील यावेळी परस्परसंवादी सत्र झाले. अभ्यासींनी सुरुवातीची तीन सिटींग घेण्याआधीचे व नंतरचे असे स्वानुभव सांगितले. बंधू मोहनदास यांनी साधना करताना योग्य दृष्टीकोन असण्याची गरज असल्याचे सांगितले. साधना यंत्रवत न होता अंत:करणपूर्वक केली जावी असे ते पुढे म्हणाले. आपणांस शक्य असेल तेव्हा, वारंवार गुरुदेवांना भेटणे गरजेचे आहे; तसेच आपला अंतर्गत संबंध त्यांच्याशी प्रस्थापित करून त्यांच्याशी नाते निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. असे करण्याने आपली अंतर्गत तळमळ वाढण्यास खात्रीपूर्वक मदत होते.





## मनन कार्यक्रम, तिपतुर, कर्नाटक

दि. १४ ते १५ सप्टेंबर रोजी तिपतुर, कर्नाटक येथे रूढी–परंपरांच्या पुढे जाण्याकरिता, उणीवांवर मात करण्यासाठी, साधनेबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी आणि वैयक्तिक चारित्र्याची जडण–घडण या विषयी आत्मनिरिक्षण करण्यास अभ्यासींना मदत करण्याच्या उद्देश्याने 'साधनेय चिंतन शिबिर' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये सुमारे चाळीस अभ्यासी सहभागी झाले होते.सहजमार्गपद्धती आणि साधना योग्य प्रकारे समजण्यासाठी याचा चांगला उपयोग झाला असे सहभागींना वाटले. त्यांचा प्रतिसाद उत्साहवर्धक होता. या कार्यक्रमाचे संयोजन बंधू बी. श्रीनिवासन आणि बंधू कृष्णमूर्ती यांनी केले.

## थुमकुंटा आश्रम, हैद्राबाद

सामान्यत: प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी होणाऱ्या मेळाव्याचे यजमानपद या विभागीय आश्रमाचे असते. दि. ५ ऑक्टोबर रोजी या कार्यक्रमांस २ वर्षे पूर्ण झाली. या सत्रामध्ये गुरुदेवांचे व्हिडिओ पहाणे, सहजमार्गाच्या वेगवेगळ्या पैलूंवर चर्चा करणे, वक्त्यांची सादरीकरणे, विस्पर्सच्या संदेशांचे वाचन आणि रंजक चित्रपट यांचा समावेश असतो. गुरुदेवांना, क्रेस्टला, रिट्रिट केंद्रांना भेट दिलेले अभ्यासी त्यांचे अनुभव सांगतात. असे कार्यक्रम स्थानिक अभ्यासींमधील परस्पर सबंध सुधारण्यासाठी आणि एकतेची भावना जागृत करण्यासाठी उपयुक्त ठरले आहेत. निवासी अभ्यासी या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होतात.



## कुंभकोणम, तमिळनाडू

'साहित्यातून शिक्षण' हा कार्यक्रम विभाग प्रमुख बंधू बी.एस. मुरुगन यांनी मिशनच्या साहित्याचे वाचन करण्यातील रुची वाढावी आणि सांघिकरित्या काम करण्याची व एकत्रितपणे वाढण्याची संधी मिळावी यासाठी प्रस्तावित केला होता.

सुरुवातीला हा कार्यक्रम त्रिची येथे दि. २७ जुलैला झाला आणि बाविस केंद्रातील सुमारे साठ अभ्यासी यात सहभागी झाले. विभागाचे १४ गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले होते व प्रत्येक गटात ५–६ केंद्रे आणि १ समन्वयकाचा समावेश होता. कुंभकोणम, करैकल, तिरुवरुर, नागापट्टीनम, कुडावसल आणि मयिलादुथुरै यांनी बनलेल्या गट क्र.५ याचे पहिले सत्र दि. ८ सप्टेंबर रोजी कुंभकोणम येथे झाले. तेवीस अभ्यासींनी 'सत्योदय' या पुस्तकाचे वाचन करावयास घेतले. सहभागींनी पुस्तकातून शिकण्यात खूप रस दाखविला आणि या कार्यक्रमाचा त्यांचे आकलन वाढण्यास उपयोग झाला असे वाटले.

## अंजद, मध्यप्रदेश

दि. ८ सप्टेंबर रोजी सहजमार्ग साधनेच्या विविध पैलूंविषयी एक कार्यक्रम अंजद केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये आध्यात्मिक स्थितीचे निरीक्षण आणि तिची जोपासना यांवर एका खास सत्राचा समावेश होता. अंजद, दवना, ठिकरी आणि बादवानी येथील सुमारे चाळीस अभ्यासींसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे संचालन इंदौर येथील बंधू राजेश, शैलेन्द्र आणि निलेश शर्मा यांनी केले. आपले ध्येय निश्चित करण्याचे महत्त्व यावर चर्चा करण्यात आली. "सध्या मी साधना आणि सफाई कशा प्रकारे करतो" यावर एक आत्मपरीक्षण सत्र घेण्यात आले. यानंतर गुरुदेवांनी सांगितलेल्या पद्धतीबद्दलच्या सादरीकरणाने सहभागींना त्यांच्या चुका सुधारण्याची संधी लाभली. आध्यात्मिक स्थिती टिकविण्याचे व जोपासण्याचे महत्त्व यावर एक सत्र झाले, ज्यादरम्यान सहभागींना त्यांच्या स्थितीचे काही मिनिटांसाठी निरीक्षण करण्यास सांगण्यात आले. यानंतर १५ मिनिटांसाठी ध्यान करण्यात आले व काही वेळासाठी त्यांना नि:शब्द होण्यास सांगितले गेले. त्यानंतर त्यांच्या स्थितीतील बदलाचे निरीक्षण करण्यास सांगण्यात आले आणि दैनंदिनीमध्ये त्याबद्दल लिहिण्याचा प्रयत्न करण्यास सांगितले गेले. संवेदनशीलता आणि जागरूकता/ सजगता याचे महत्व काय आहे याची जाणीव सर्वांना झाली.

## क्षणचित्रे

### कोलकाता

दि. २२ सप्टेंबर रोजी मुलांना विविध वयोगटांमध्ये विभागून, प्रार्थना म्हणणे, प्रार्थना लिहिणे आणि १० सूक्ते पाठ करणे यासारख्या निरनिराळ्या उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेण्यात आले. मोठ्या मुलांना प्रेम, शिस्त आणि ध्यान यासारख्या विषयांवर निबंध लिहिण्यास सांगितले गेले. सुमारे सत्तर मुलांनी यात उत्साहाने भाग घेतला. यामुळे मुले आणि त्यांचे पालक यांना प्रार्थना आणि १० सूक्ते शिकण्यामध्ये प्रोत्साहन मिळाले.





### कोलकाता

दि. ७ सप्टेंबर रोजी लाजपत बालिका विद्यालयातील उपमुख्याध्यापिका आणि चार शिक्षिकांनी सुमारे अठ्ठावन्न विद्यार्थिनींसह कोलकाता येथील बाबूजी मेमोरीयल आश्रमाला भेट दिली. त्यांना वेळेचे व्यवस्थापन, मानवता आणि अनुकंपा या विषयांवर आधारित व्हि.बी.एस.इ. (मूल्य शिक्षण) प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. शिक्षिका आणि विद्यार्थिनींना मिशनसोबत अधिक संवाद साधावा असे जाणवले. काही शिक्षिकांनी साधना सुरु करण्यामध्ये रस दाखवला.



### वडोदरा

दि. १३ आक्टोबर रोजी बंधू बिट्टु भाई यांनी मुलांच्या केंद्रातील स्वयंसेवकांसोबत नवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी 'गरबा नृत्याचे' आयोजन केले होते. सत्संगानंतर गरब्याच्या खास रंगीबेरंगी वेशभूषेतील मुलांनी नृत्य केले. त्यांचे पालक आणि इतर मोठी माणसेही या कार्यक्रमात सहभागी झाली. हा कार्यक्रम खूप मौजेचा आणि आनंददायी झाला.

### मुरादाबाद, उत्तर प्रदेश

दि. २९ सप्टेंबर रोजी दैनंदिनी लिखाण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अठ्ठावीस सहभागींना तीन गटांमध्ये विभागुन चार समन्वयकांनी ही कार्यशाळा संचालित केली. हा सर्व सहभागींसाठी सुखद असा अनुभव होता. बहुतांश जणांना आपण दैनंदिनीमध्ये लिहिलेली स्थिती गुरुदेवांना आपोआप समजते असे जाणवले. हे सत्र दुपारी सुमारे २.३० वाजेपर्यंत चालले.




### इंदौर, मध्यप्रदेश

दि. ३१ ऑगस्ट रोजी सहा अभ्यासी आत्मपरीक्षण करुन गुरुदेवांसमवेत दुवा निर्माण करण्यासाठी इंदौर आश्रमामध्ये एकत्र आले. 'वैश्विक संदेश' मधील गुरुदेवांच्या भाषणातील उताऱ्यांचे वाचन करण्यात आले. गुरुदेवांना आपले आध्यात्मिक हृदय मानून त्यांचे आंतरिकीकरण करणे का आवश्यक आहे याविषयी हे उतारे होते. अभ्यासींना आत्मपरीक्षण करुन दैनंदिनीमध्ये त्या निरीक्षणांची नोंद करून ठेवण्याची संधी मिळाली.

### चिखली, महाराष्ट्र

दि. ६ ऑक्टोबर रोजी सुमारे पासष्ट अभ्यासींकरिता 'सतत स्मरण' या विषयावर पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासी पूर्वतयारी करून आले असल्याने व त्यांनी प्रश्न विचारल्यामुळे विचारविनिमय माहितीपूर्ण झाला. केंद्रप्रमुख बंधू संजय लाहोटी यांनी चर्चेचा समारोप केला.

चिखली केंद्र गेले दोन महिने एका अभिनव उपक्रमाचे आयोजन करीत आहे. प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी उपस्थित अभ्यासींना दहा गटांमध्ये विभागण्यात येते. प्रत्येक गटाला एक पुस्तक देण्यात येते व त्यातील दोन विशिष्ट प्रकरणे वाचण्यास संगितले जाते. दुपारच्या जेवणाच्या वेळी बंधू तुलसीराम प्रत्येक प्रकरणावर आधारित दहा प्रश्नांची एक प्रश्नावली तयार करतात. दुपारच्या सत्रादरम्यान या प्रश्नावली त्या त्या गटाला देण्यात येतात. एका तासाच्या अवधीमध्ये या प्रश्नांची उत्तरे शोधणे अपेक्षित असते. यानंतर प्रत्येक गट प्रश्न व उत्तरांचे सादरीकरण करतो. सुमारे दोन तास चालणारा हा कार्यक्रम अभ्यासींना मिशनची पुस्तके वाचण्यास प्रवृत्त करतो.



## खुली सत्रे



दि. १२ सप्टेंबर रोजी शुभारंभ टॉवर्स, **ठाणे** येथे वीस मुमुक्षुंना, मूर्तीच्या स्वरूपात बाहेर देवाचा शोध घेण्याऐवजी स्वत:च्या हृदयाच्या केंद्रामध्ये त्याला शोधणे का महत्त्वाचे आहे तसेच याकरिता 'ध्यान' कसे उपयोगी पडेल याविषयी सांगण्यात आले. सुमारे ५/६ सहभागींनी चांगला प्रतिसाद दिला.**विरुधुनगर** येथील कामराज अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये दि. १७ ऑगस्ट रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. बंधू टी.के.अरुमुगम व बंधू बालसुब्रमणियम यांनी उपस्थितांना संबोधित केले. अभ्यासींनी मुख्याध्यापकांची भेट घेतली. त्यांनी याविषयी कुतूहल दाखविले. इच्छुक विद्यार्थ्यांना ध्यानसाधनेसाठी योग्य त्या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून दिल्या जातील असे त्यांनी सांगितले.





एक डझनहूनही कमी अभ्यासी असणाऱ्या **झाबुआ** या मध्य प्रदेशातील छोट्या केंद्राने दि. १ सप्टेंबर रोजी शासकीय तंत्रनिकेतन, झाबुआ येथे एका सत्राचे आयोजन केले होते. हे सुमारे ४०० आदिवासी विद्यार्थ्यांचे निवासी विद्यालय आहे. बंधू प्रभाकर यांनी विद्यार्थ्यांना आध्यात्मिकतेचे व ध्यानाचे महत्त्व उदाहरणांसहित सांगितले. ९८ इच्छुक विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात आली व पुढील आठवड्यात वेगवेगळ्या केंद्रांतील प्रशिक्षक सुरुवातीची सिटिंग्स देण्याकरिता झाबुआ येथे पोहोचले.

### नवीन नेमणूका

बंधू सुरिंदर शर्मा

विभाग प्रमुख जम्मु व काश्मीर

## होसूर अभ्यासी वसाहत

### योग्य नियोजन व अंमलबजावणीचे उदाहरण



योग्य अशा पायाभूत सुविधा व चांगल्या जीवनासाठी पोषक वातावरण यांनी युक्त अशी अभ्यासींची निवासी वसाहत वेगाने साकारत आहे. ही वसाहत इतर अभ्यासी वसाहतींकरिता आदर्श ठरली आहे. सखोल असे आर्थिक नियोजन व अभ्यासींचे सांघिक कार्य यांचा परिणामस्वरूप होसूर आश्रमाच्या शेजारी असणाऱ्या या वसाहतीला आदर्श म्हणून गणले जाते.

तामिळनाडू सरकारने निर्माण केलेले औद्योगिक केंद्र होसूर हे बेंगलुरुच्या पूर्वेला केवळ पंचवीस कि.मी. अंतरावर आहे. आश्रमासाठी जमिनीचा शोध १९९५ पासून सुरू झाला होता. होसूर बस स्थानकापासून ५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या, केलावरापल्ली धरणाच्या समोर, अवालापल्ली गावामध्ये या शोधाचे फळ २००९ मध्ये मिळाले. विभाग प्रमुख बंधू सी. राजगोपालन यांनी या जागेची पाहणी करून पुढे जाण्यासाठी हिरवा कंदील दाखवला.

**'त्यां'ची दूरदृष्टी**

अनेक वर्षांपूर्वी जेव्हा एका अभ्यासीला होसूर आश्रमाकरिता काही जमीन देणगीरूपाने द्यायची होती, तेव्हा गुरुदेवांनी नम्रपणे (नकार देताना) सांगितले "होसूरला एकर्सची आवश्यकता आहे" गुरुदेवांच्या कृपेने जेव्हा १३.८ एकर्स जमीन विकत घेण्यात आली तेव्हा त्यांच्या दूरदृष्टीचा पडताळा आला. यापैकी ४.७५ एकर्स आश्रमाकरिता राखीव असून उरलेल्या जागेवर अभ्यासी वसाहत निर्माण करण्यात आली आहे. दि. २२ जानेवारी २०१० रोजी बंधू ए.पी.दुरै, संयुक्त सचिव,

यांनी आश्रमाच्या जागेचे नोंदणीकरण केले. गुरुदेव या सांघिक कार्याने उल्हसित झाले व त्यांनी या वसाहतीचे 'प्रगति एन्क्लेव' असे नामकरण केले.

**प्रमुख गट**

वित्त, पायाभूत सुविधा, कायद्याशी संबंधित गोष्टी इत्यादि विषयी निर्णय घेण्यासाठी सात जणांच्या एका मुख्य गटाची स्थापना करण्यात आली आहे. अभ्यासींबरोबर समन्वय साधून व विचारविनिमय करून या गटाने निर्णय घेतले आहेत. जमिनीची किंमत, घरांसाठी पायाभूत सुविधा, आश्रमाच्या जागेसाठी देणगी, आश्रमाकरिता पायाभूत सोयी आणि दीर्घकालीन देखभाल खर्च यांचा विचार करून जमिनीच्या विक्रीयोग्य तुकड्यांची किंमत निश्चित करण्यात आली आहे.

**पायाभूत सुविधा**

प्रकल्पाच्या आराखड्यात २४०० चौ. फूटाचे १०२ भूखंड आहेत. कुंपणाची भिंत, पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था, एक लक्ष चौ. घनलिटर क्षमतेची उंचावर बांधलेली पाण्याची टाकी, दोन भू-विहिरी, सर्व भूखंडांसाठी पाण्याची जोडणी, पक्के काँक्रीटचे रस्ते, एक सभागृह (जे सध्या ध्यानगृह म्हणून वापरले जात आहे), मुलांकरिता खेळण्याचे मैदान व सर्वांकरिता बगिचे या सोयी-सुविधा सध्या उपलब्ध आहेत. रस्त्यांच्या कडेला लागवड केलेल्या ७०० वृक्षांमुळे आश्रमाच्या सौंदर्यात भर पडत आहे. प्रत्येक भूखंडासाठी विजेची जोडणी देण्यात आली आहे. जर्मन शेफर्ड जातीच्या कुत्र्यामुळे अहोरात्र संरक्षण उपलब्ध आहे. भविष्यामध्ये संपूर्ण प्रकल्पामध्ये सौर-उर्जेवर चालणारे दिवे बसविणे व 'रेन वॉटर हार्वेस्टींग' ह्या या प्रकल्पातील पुढच्या पायऱ्या आहेत.

**वसाहतीमध्ये निवास**

केवळ तीन वर्षांच्या अल्पकाळात आराखड्यामधील दहा घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. दोन घरे बांधण्यात येत आहेत तर अजून काही लवकरच बांधली जाणार आहेत. आश्रमाच्या वातावरणात निवास करण्याचे सुख अभ्यासी उपभोगीत आहेत. बंधुत्व आणि सहिष्णुता यांच्या वृद्धिसाठी एका मोठ्या कुटुंबाप्रमाणे एकत्र राहण्याची विशेष अशी संधी गुरुदेवांनी आपल्याला दिली आहे याची सर्वांना जाणीव आहे. आश्रमाच्या शांत अशा वातावर्णातील वास्तव्य आत्मनिरीक्षण करणे व आदर्श अभ्यासी



बनण्यासाठी स्वत:ला अधिकाधिक शुद्ध बनविणे यासाठी उपयुक्त ठरत आहे. आश्रमाच्या परिसरात प्रवेश केल्यावर बाहेर जाण्याची इच्छा होत नाही, असे सर्वांचे मत आहे. येथे राहणाऱ्या मुलांना खेळण्यासाठी, नव्या गोष्टींचा शोध घेण्यासाठी, एकमेकांबरोबर जोडले जाण्यासाठी आणि संतुलित अशा नैसर्गिक वातावरणात राहण्यासाठी ही वसाहत लाभदायक ठरत आहे.

आश्रमाच्या जमिनीवर उगविण्यात येणाऱ्या मोसमी भाज्या व धान्ये यांची देखभालही अभ्यासींद्वारा केली जाते. खाजगी बगिच्यांमध्ये पिकवलेल्या भाज्या व फळे आपसात वाटल्या जातात. अशा प्रकारच्या वसाहतीमध्ये राहण्याचा मुख्य फायदा म्हणजे येथले सर्व अभ्यासी एक संयुक्त ध्येय गाठण्याचा प्रयत्न करीत आहेत तसेच बंधुभावाच्या, परस्परांवरील विश्वासाच्या आणि सहिष्णुतेच्या उच्च पातळीपर्यंत पोचण्याचा प्रयास करीत आहेत. येथे भेट देणाऱ्या व्यक्तींना येथील स्वच्छ, प्रसन्न, निसर्गाशी मैत्री राखणारे वातावरण स्वागतपर वाटते.

**आश्रम प्रकल्प**

आश्रमाच्या उभारणीसाठी गुरुदेवांनी परवानगी दिली आहे. ध्यान-गृह, निवासकक्ष व भोजनकक्ष यांचा अंतर्भाव असणाऱ्या आराखड्याला मान्यता देण्याची प्रक्रिया चेन्नई येथील प्रमुख कार्यालयात प्रगतीपथावर आहे. सध्या अस्थायी स्वरूपाच्या कक्षामधे सत्संगाचे संचालन केले जाते, जो भविष्यकाळामध्ये दुसऱ्या कारणासाठी वापरला जाईल. तसेच, अस्थायी स्वरूपाचे स्वयंपाक-गृह व पाहुण्यांकरिता एक खोलीसुद्धा तयार करण्यात आली आहे. इतर केंद्रांमधील वा आश्रमांमधील वसाहतींचे नियोजन करणाऱ्यांना या प्रकल्पाला भेट दिल्यास फायदा होईल.







To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.